


**E-ISSN:** 2706-8927
**P-ISSN:** 2706-8919
IJAAS 2020; 2(1): 110-113
Received: 10-11-2019
Accepted: 12-12-2019

**डॉ. विजयसिंज आय. जिरासे**
सहयोजी प्राध्यापज , वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाजा, जी.टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार, महाराष्ट्र, भारत

# युजीसीच्या दहाव्या व अकराव्या योजनांचा उच्च शिक्षणावर झालेल्या परिणामांचा अभ्यास

**डॉ. विजयसिंग आय. जिरासे**

**सारांश**
प्रस्तुत संशोधन निबंधात विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या दहाव्या व अकराव्या योजनांच्या (2002-2012) माध्यमातून महाविद्यालयांना मुलभूत सुविधा, शैक्षणिक सुविधा व संशोधनात्मक सुविधा व सोयी उपलब्ध करून दिल्या. अशा आर्थिक साह्यांचा धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांचा शैक्षणिक, मुलभूत, भौतिक, व्यावसायिक, तांत्रिक, संशोधनात्मक व सामाजिक विकासावर काय परिजाम झाला आहे, याचा संशोधनाच्या माध्यमातून प्रकाश टाकलेला आहे.

**बीज शब्द:** युजीसी योजना, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांचा शैक्षणिक व भौतिक विकास, शिक्षक व विद्यार्थ्यांना लाभ.

## प्रस्तावना

### उद्दिष्ट्ये

- विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयीन शैक्षणिक विकासाचा आढावा घेजे.
- विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मिळणाज्या अनुदानातून (Granting) महाविद्यालयांच्या प्रगतीचा अभ्यास करणे.
- यु.जी.सी. अनुदानाद्वारे संशोधन विकासाचा तसेच भौतिक प्रगतीचा अभ्यास ज रजे.
- यु.जी.सी. अनुदानाद्वारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या शैक्षणिक प्रगतीचा अभ्यास करणे.

### गृहीतके

1) यु.जी.सी. अनुदानाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची प्रगती झाली आहे.
2) यु.जी.सी. अनुदानाद्वारे शिक्षज व विद्यार्थी यांना शैजजिज लाभ झाला आहे.
3) यु.जी.सी. अनुदानापासून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अनेक महाविद्यालये प्रगती व विकासापसून वंचित आहेत.
4) यु.जी.सी. अनुदानाद्वारे महाविद्यालयांची भौतिक प्रगती झाली आहे.

### माहितीचे स्त्रोत

संशोधकाने संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती शास्त्रोक्तपद्धतीने अभ्यासपूर्वक उपलब्ध असलेल्या मार्गाचा वापर करुन प्राप्त करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी संशोधकाने खालील पद्धतीने माहिती प्राप्त केली.

### प्राथमिक स्त्रोत

संशोधकाने संशोधनासाठी उपलब्ध नसलेली माहिती प्राथमिक स्त्रोताचा वापर करुन प्राप्त केली. संशोधनाची उद्दिष्ट्ये व गृहीतके पडताळणी करण्यासाठी प्राथमिक माहिती आवश्यक असते. त्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित प्रश्नावलीची रचना जेली. प्रश्नावली संशोधन क्षेत्रात उत्तरदात्यांना वाटप केली. व परिपूर्ण प्रश्नावलीचा संशोधन कार्यासाठी उपयोग केला. तसेच संशोधनासाठी आवश्यक माहिती प्राप्तीसाठी उत्तरदात्यांशी चर्चा करुन वेळप्रसंगी तोंडी प्रश्न विचारुन उत्तरांची नोंद केली. तसेच संशोधकाने प्राप्त झालेली माहिती संकेतस्थळावर भेट देवून पडताळणी केली आहे.

### दुय्यम स्त्रोत

संशोधकाने प्राथमिक माहिती बरोबरच तथ्य संकलनासाठी माहितीच्या समर्थनार्थ विविध पुस्तके, अग्रलेज, प्रसिद्ध झालेले संशोधन लेख, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थरावरील संशोधन पत्रिकेतील संदर्भ, विद्यापीठ अनुदान आयोगाचे वेळोवेळी प्रकाशित झालेले मार्गदर्शक तत्व व अहवाल, प्रत्येक योजनेची परिपत्रके, विविध योजनांच्या अटी व शर्ती, उच्च शिजजाशी संबंधित विविध संकेतस्थळे, वृत्तपत्रे, तंज्ञव्यक्तींचे लेख मासिके यांचा सखोल अभ्यास करुन दुय्यम स्वरुपाची माहिती प्राप्त केली आहे. व संशोधनात आवश्यकतेनुसार वापर केलेला आहे.

### गृहीतक चाचणी

**गृहीतक ज्र . 1**

$H_0$ (व्यर्थहीन गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची प्रगती झाली नाही.

**Corresponding Author:**
**डॉ. विजयसिंज आय. जिरासे**
सहयोजी प्राध्यापज , वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाजा, जी.टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार, महाराष्ट्र, भारत

$H_1$ (पर्यायी गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची प्रगती झाली आहे.
वरील गृहीतक प्रमाणित करण्यासाठी संशोधकाने 50 टक्के परिणाम गृहीत धरला असून प्राप्त माहितीची तुलना केलेली आहे. त्यानुसार

- जर स्वीकृती दर्शज 50 टक्क्यांपेक्षा जास्त - गृहीतक अस्वीकृत
- जर स्वीकृती दर्शक 50 टक्क्यांपेक्षा कमी - गृहीतक स्वीकृत

**जृहीतक चाचणी क्र. 1**

| अ. ज्र. | चाचणी घटक | स्वीकृती दर्शक (टक्केवारी) | अस्वीकृत दर्शक (टक्केवारी) | माहित नाही (टक्केवारी) | र्निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे अनुदान मिळाले आहे. | 83.72% | 14.95% | 1.33% | $H_0$ =>50% Rejected |
| 2 | विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे शिक्षण संबंधित विविध घटकांना अनुदान मिळाले आहे. | 84.00% | 14.11% | 1.89% | $H_0$ =>50% Rejected |
| 3 | महाविद्यालय परिसरात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाचा अनुकूल परिणाम झाला आहे. | 84.38% | 14.68% | 0.99% | $H_0$ =>50% Rejected |
| 4 | महाविद्यालयाच्या एकूण संपत्तीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाने वाढ झाली आहे. | 82.75% | 15.12% | 02.16% | $H_0$ =>50% Rejected |
| 5 | विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे प्राप्त विशेष अनुदानाने संगणक प्रणाली, इंटरनेट, ग्रंथालयद्वारा विविध घटकांच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे. | 84.71% | 14.78% | 0.51% | $H_0$ =>50% Rejected |
| 6 | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विविध योजना व अनुदानामुळे नॅकच्या मानांकनात वाढ झाली. | 82.89% | 14.95% | 2.16% | $H_0$ =>50% Rejected |
| 7 | आपल्या महाविद्यालयाची प्रतिष्ठा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानामुळे वाढली. | 84.00% | 15.28% | 0.72% | $H_0$ =>50% Rejected |
| 8 | परिसरात आपले महाविद्यालय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजना आणि अनुदानामुळे लोज प्रिय झाले. | 83.55% | 15.28% | 0.99% | $H_0$ =>50% Rejected |

**(संकलित माहितीच्या आधारे)**
चाचणीअंती विविध घटकांची निर्णायक स्थिती अभ्यासली असता असे स्पष्ट होते ज़ी, अनुक्रमांक 1 ते अनुक्रमांक 8 सर्वचे सर्व घटक व्यर्थहीन गृहीतके अस्वीकृत झालेले आहे. व पर्यायी गृहीतक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची प्रगती झाली आहे. - स्वीकृत.

**जृहीतक क्र. 2**

- $H_0$ (व्यर्थहीन गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे शिजज व विद्यार्थी यांना शैजजिज लाभ झाला नाही.
- $H_1$ (पर्यायी गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे शिक्षक व विद्यार्थी यांना शैजजिज लाभ झाला आहे.

वरील गृहीतक प्रमाणित करण्यासाठी संशोधजाने 50 टक्के परिणाम गृहीत धरला असून प्राप्त माहितीची तुलना केलेली आहे. त्यानुसार

- जर स्वीकृती दर्शक 50 टक्क्यांपेक्षा जास्त - गृहीतक अस्वीकृत
- जर स्वीकृती दर्शक 50 टक्क्यांपेक्षा कमी - गृहीतक स्वीकृत

**जृहीतक चाचणी क्र. 2**

| अ. क्र. | चाचणी घटक | स्वीकृती दर्शक (टक्केवारी) | अस्वीकृत दर्शक (टक्केवारी) | माहित नाही (टक्केवारी) | र्निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आमच्या अपेक्षेप्रमाणे संशोधन प्रकल्पांना अनुदान मिळाले | 83.40% | 13.28% | 3.32% | $H_0$ =>50% Rejected |
| 2 | आमच्या महाविद्यालयातील प्रयोगशाळा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानामुळे सुसज्ज व आधुनिक झाल्या. | 84.38% | 14.95% | 0.67% | $H_0$ =>50% Rejected |
| 3 | महाविद्यालयातील ग्रंथालयातील ग्रंथसंपदा व ग्रंथालयाचे आधुनिकीकरण विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाने यशस्वी झाल्या. | 83.00% | 15.34% | 1.66% | $H_0$ =>50% Rejected |
| 4 | महाविद्यालयातील अध्यापन पद्धती प्रणाली विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानामुळे विकसित झाली. | 82.74% | 14.61% | 2.65% | $H_0$ =>50% Rejected |
| 5 | महाविद्यालयातील क्रिडांगणे सुसज्ज इनडोअर व आऊटडोअर खेळांची सुविधा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून उपलब्ध झाली. | 83.72% | 14.29% | 1.99% | $H_0$ =>50% Rejected |
| 6 | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील माहितीची देवाण-घेवाण विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विविध उपक्रमांमुळे जलद गतीने शक्य झाले. | 82.00% | 15.85% | 2.15% | $H_0$ =>50% Rejected |

**(संकलित माहितीच्या आधारे)**
चाचणीअंती विविध घटकांची निर्णायक स्थिती अभ्यासली असता असे स्पष्ट होते की, अनुक्रमांक 1 ते अनुक्रमांक ६ सर्व चे सर्व घटक व्यर्थहीन गृहीतके अस्वीकृत झालेले आहेत. व पर्यायी गृहीतक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदा-नाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांना शैक्षणिक लाभ झाला आहे. - स्वीकृत.

**जृहीतक क्र. 3**

- $H_0$ (व्यर्थहीन गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगापासून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अनेक महाविद्यालये प्रगती व विकासापासून वंचीत नाही.
- $H_1$ (पर्यायी गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगापासून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अनेक महाविद्यालये प्रगती व विकासापासून वंचीत आहेत.

वरील गृहीतक प्रमाणित करण्यासाठी संशोधकाने 50 टक्के परिणाम गृहीत धरला असून प्राप्त माहितीची तुलना केलेली आहे. त्यानुसार

- जर स्वीकृती दर्शक 50 टक्क्यांपेक्षा जास्त - गृहीतक अस्वीकृत
- जर स्वीकृती दर्शज 50 टक्क्यांपेक्षा कमी - गृहीतक स्वीकृत

**गृहीतक चाचणी क्र. 3**

| अ. क्र. | चाचणी घटक | स्वीकृती दर्शक (टक्केवारी) | अस्वीकृत दर्शक (टक्केवारी) | माहित नाही (टक्केवारी) | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महाविद्यालयांना मिळणारे अनुदान पर्याप्त आहे. | 80.56% | 16.29% | 3.15% | $H_1$ =>50% Rejected |
| 2 | महाविद्यालयांना प्राप्त होणारे अनुदान वेळेवर मिळते. | 82.72% | 15.62% | 1.66% | $H_1$ =>50% Rejected |
| 3 | महाविद्यालयांना मिळणारे अनुदान मंजूर होण्याचे प्रमाण योग्य आहे. | 84.06% | 15.28% | 0.66% | $H_1$ =>50% Rejected |
| 4 | अनुदान मिळण्यासाठीचे निकष, अटी व शर्ती कठिण आहे. | 84.38% | 14.96% | 0.66% | $H_1$ =>50% Rejected |
| 5 | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाची व योजनांची माहिती पारदर्शी आहे. | 83.38% | 14.46% | 2.16% | $H_1$ =>50% Rejected |

**(संकलित माहितीच्या आधारे)**

चाचणीअंती विविध घटकांची निर्णायक स्थिती अभ्यासली असता असे स्पष्ट होते की, अनुक्रमांक 1 ते अनुक्रमांक 5 सर्व चे सर्व घटक व्यर्थहीन गृहीतके अस्वीकृत झालेले आहे. व पर्यायी गृहीतक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अनेक महाविद्यालये प्रगती व विकासापासून वंचित आहेत. - अस्वीकृत

**गृहीतक क्र. 4**

- $H_0$ (व्यर्थहीन गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे महाविद्यालयांची भौतिक प्रगती झाली नाही.
- $H_1$ (पर्यायी गृहीतक) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे महाविद्यालयांची भौतिक प्रगती झाली आहे.

वरील गृहीतक प्रमाणित करण्यासाठी संशोधकाने 50 टक्के परिणाम गृहीत धरला असून प्राप्त माहितीची तुलना केलेली आहे. त्यानुसार

- जर स्वीकृती दर्शक 50 टक्क्यांपेक्षा जास्त - गृहीतक अस्वीकृत
- जर स्वीकृती दर्शक 50 टक्क्यांपेक्षा कमी - गृहीतक स्वीकृत

**गृहीतक चाचणी क्र. 4**

| अ. क्र. | चाचणी घटक | स्वीकृती दर्शक (टक्केवारी) | अस्वीकृत दर्शक (टक्केवारी) | माहित नाही (टक्केवारी) | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वसतिगृहे बांधकाम पुरेसे आहे. | 81.40% | 16.61% | 1.99% | $H_0$ =>50% Rejected |
| 2 | महाविद्यालयातील ग्रंथालय सुविधा व इमारत कार्यक्षेत्र पुरेसे आहे. | 82.72% | 15.95% | 1.33% | $H_0$ =>50% Rejected |
| 3 | क्रिडाक्षेत्रासाठी क्रिडांगण अनुदान पुरेसे आहे. | 79.73% | 16.94% | 3.33% | $H_0$ =>50% Rejected |
| 4 | प्रयोगशाळेसाठी प्राप्त होणारे अनुदान पुरेसे आहे. | 83.72% | 14.95% | 1.33% | $H_0$ =>50% Rejected |
| 5 | विविध उपक्रमांसाठी प्राप्त होणारे अनुदान पुरेसे आहे. | 80.56% | 16.28% | 3.16% | $H_0$ =>50% Rejected |
| 6 | आदिवासी विद्यार्थ्यांसाठी प्राप्त होणारे अनुदान पुरेसे आहे. | 78.90% | 17.11% | 3.99% | $H_0$ =>50% Rejected |

**(संकलित माहितीच्या आधारे)**

चाचणीअंती विविध घटकांची निर्णायक स्थिती अभ्यासली असता असे स्पष्ट होते की, अनुक्रमांक 1 ते अनुक्रमांक 6 सर्व चे सर्व घटक व्यर्थहीन गृहीतके अस्वीकृत झालेले आहे. व पर्यायी गृहीतक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानाद्वारे महाविद्यालयांची भौतिक प्रगती झाली आहे. - स्वीकृत

**निष्कर्ष व शिफारशी**

- संशोधनासाठी पुरुष व स्त्रीनिहाय प्राप्त झालेला प्रतिसादानुसार 57.17 टक्के पुरुष तर 41.03 टक्के महिला उत्तरदात्याचा प्रतिसाद प्राप्त झालेला आहे. त्यानुसार जवळपास समान तत्त्वावर पुरुष आणि स्त्री यांचा सहभाग शैक्षणिक क्षेत्रात आढळून येतो.
- प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार उच्चविद्याविभूषित म्हणजेच प्राचार्य व प्राध्यापक यांचे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील प्रमाण हे 20.75 टक्के आहे तर पदवी व पदव्युत्तर प्राप्त सहभागीची संख्या 79.25 टक्के आढळून येते.
- सरकारच्या धोरणानुसार विनाअनुदान तत्वावर महाविद्यालय कार्यरत आहेत त्यामुळे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयात 17.15 टक्के प्राध्यापक विनाअनुदान तत्वावर काम करतात असे स्पष्ट होते.
- 5 वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या प्राचार्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या जास्तीत जास्त योजनांचा लाभ मिळविल्याचे निदर्शनास येते व अशा प्राचार्यांचे प्रमाण 76 टक्के आहे. त्या तुलनेत कमी अनुभव असलेल्या प्राचार्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनांचा कमी लाभ झाल्याचे जाणवते.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उद्देशानुसार धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांनी इमारत बांधकाम, वसतिगृह, ग्रंथालय या योजनांना प्रतिसाद दिल्याचे स्पष्ट होते. मात्र संशोधन क्षेत्रातील महाविद्यालयांचा सहभाग इतर योजनांच्या तुलनेने कमी असल्याचे स्पष्ट होते.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विविध योजनांमुळे महाविद्यालयांचा परिसर व सुविधा वाढलेल्या दिसून येतात तसेच वसतिगृहाच्या उपलब्धतेमुळे विद्यार्थी समाधानी दिसून येतात. व ग्रंथालय अनुदानामुळे प्राध्यापक व विद्यार्थी यांना ज्ञान भांडाराची सुविधा निर्माण झाल्याचे स्पष्ट होते.
- एकूण 27 महाविद्यालयांपैकी 16 महाविद्यालयांना 50 लाखापेक्षा कमी अनुदान मिळाले आहे. तर 50 लाखापेक्षा जास्त अनुदान मिळविणाऱ्या महाविद्यालयांची संख्या 05 आहे तसेच 1 कोटीपेक्षा जास्त अनुदान मिळविणाऱ्या महाविद्यालयांची संख्या देखिल 06 असल्याचे स्पष्ट होते.
- 10 व्या व 11 व्या योजनेत बहुतांश महाविद्यालयांच्या निधीत 1 टक्के ते 26 टक्के वाढ किंवा घट झालेली दिसून येते. ज्या महाविद्यालयांच्या निधीत घट झालेली आहे. अशा महाविद्यालयांनी बहुताश योजना पूर्ण केलेल्या असल्याने त्यांच्या निधीत घट झालेली असावी असे स्पष्ट होते.
- एकूण 27 महाविद्यालयांना अनुदान मंजूर झाल्याचे दिसून येते. त्यापैकी 100 टक्के अनुदान प्राप्त करणारे 04 महाविद्यालय, 06 महाविद्यालये 88

टक्के, 06 महाविद्यालय 71 टक्के, 04 महाविद्यालय 55 टक्के, 06 महाविद्यालय ३९ टक्के, ०१ महाविद्यालय केवळ २० टक्के अनुदान मंजूर झाल्याचे दिसून येते.

- विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे दिल्या जाणाऱ्या विशेष अनुदानातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांपर्यंत इंटरनेट, संगणक इ. सुविधा कायमस्वरुपी सुरु झाल्या. महाविद्यालये, विद्यापीठ, शासन एकमेकांशी जोडले गेले हा विशेष लाभ महाविद्यालयांना झालेला दिसून येतो.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची प्रगती झाली आहे. असे सरासरी 83.68 टक्के उत्तरदात्यांनी स्पष्ट केले आहे. 14.91 टक्के उत्तरदात्यांनी प्रगती झाली नाही. असे मत नोंदविलेले आहे. तर 01.41 टक्के उत्तरदात्यांनी माहिती नाही असा कल दिल्याचे स्पष्ट होते.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची भौतिक व शैक्षणिक प्रगती झाली आहे. असे सरासरी 83.20 टक्के उत्तरदात्यांनी स्पष्ट केले आहे. 14.72 टक्के उत्तरदात्यांनी प्रगती झाली नाही. असे मत नोंदविले आहे. तर 02.08 टक्के उत्तरदात्यांनी माहिती नाही असा कल दिल्याचे स्पष्ट होते.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांची भौतिक व शैक्षणिक प्रगती झाली आहे. असे सरासरी 83.02 टक्के उत्तरदात्यांनी स्पष्ट केले आहे. 15.32 टक्के उत्तरदात्यांनी प्रगती झाली नाही. असे मत नोंदविले आहे. तर 01.66 टक्के उत्तरदात्यांनी माहिती नाही असा कल दिल्याचे स्पष्ट होते.
- संशोधनासाठी पुरुष व स्त्रीनिहाय प्राप्त झालेल्या प्रतिसादानुसार 57.17 टक्के पुरुष तर 41.03 टक्के महिला उत्तरदात्यांचा प्रतिसाद प्राप्त झालेला असून उच्च शिक्षणात स्त्री या घटकाला विद्यापीठ अनुदान आयोगाने विशेष योजना राबविण्याची आवश्यकता आहे.
- विद्यापीठ अनुदान आयोगाने, विना अनुदान तत्वावर महाविद्यालये कार्यरत आहेत. याबाबत गांभिर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असून शैक्षणिक क्षेत्रात विना अनुदान तत्व समूळ नष्ट करण्याची तसेच राष्ट्रीय धोरणात आग्रही भूमिका मांडण्याची गरज आहे.
- विद्यापीठ अनुदान आयोगाने प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या संशोधन कार्यास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असून इमारत बांधकाम अनुदान मंजूर करतांना संशोधनातील सहभाग सक्तीचा करण्याचे आवश्यक वाटते.
- ज्या महाविद्यालयांची 10 व्या व 11 व्या योजनेअंतर्गत 15 लाखापेक्षा कमी निधी मिळविला आहे. अशा महाविद्यालयांनी अभ्यासपूर्वक योजनांची तयारी करुन मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त करण्याची आवश्यकता आहे.
- विद्यापीठ अनुदान आयोगाने दर वर्षी विशेष अनुदान योजना राबवावी व महाविद्यालयांची साधन संपत्ती वाढविण्यास, आधुनिकीरण करण्यास प्रोत्साहीत करावे.

**संदर्भ**


1. आगलावे प्रदीप, संशोधन पद्धती व तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर
2. संशोधन दस्तऐवज
3. प्राचार्य डॉ. व्ही.एस. देसले, उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह, अथर्व पब्लिकेशन, जळगाव
4. डॉ. शुभदा राठी-ठाकरे, राजकीय सामाजिक संशोधन पद्धती, अथर्व पब्लिकेशन, जळगाव
5. डॉ. व्ही.एस. पाटील, शिक्षण आणि विकास, अथर्व पब्लिकेशन, जळगाव
6. C.R. Kothari, Gaurav Gara (2014), Research Methodology Methods and Techniques.
7. www.ugc.ac.in
8. www.nmu.ac.in
9. www.dhule.nic.in
10. www.nandurbar.nic.in
11. ugc annual report 2010-2011
12. https:study.com
13. वृत्तपत्रे व मासिके